# बोर्ड कृतिपत्रिका: मार्च २०१९

## मराठी कुमारभारती

**वेळ: ३ तास** **एकूण गुण: १००**

**कृतिपत्रिकेसाठी सूचना: -**

(1) सूचनेनुसार आकलनकृती व व्याकरण यांमधील आकृत्या काढाव्यात.

(2) आकृत्या पेननेच काढाव्यात.

(3) उपयोजित लेखनातील कृतींसाठी (सूचना, निवेदन), आकृतीची आवश्यकता नाही. तसेच या कृती लिहून घेऊ नयेत.

(4) विभाग-5 उपयोजित लेखन प्र.5 (अ) (2) सारांशलेखन या घटकासाठी गदय विभागातील प्र.1 (इ) अपठित उतारा वाचून त्या उताऱ्याचा सारांश लिहावयाचा आहे.


(5) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष दयावे.

### विभाग १ – गदय

**पठित गदय**

**1. (अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा:**

**१. खालील आकृती पूर्ण करा.** **[२]**




आमची ढाळज म्हणजे गावचं वर्तमानपत्र होतं आणि आजी त्याची संपादक होती. तर सगळ्या बातम्या तिथं यायच्या. त्यांची शहानिशा व्हायची न् मग त्या गावभर जायच्या. कडुसं पडायच्या आधी ही मैफिल मोडायची. माणसांची वेळ झाली, की म्हातारीची ढाळज सुटायची. माणसं ढाळजंत बसायची. रात्री आठच्या दरम्यान ढाळजंचा दरवाजा लागला आणि एकदा आतनं आगळ टाकली, की वाडा शांत व्हायचा. ही आगळ दरवाजाला लावणं किंवा ती काढणं म्हणजे आमच्यासाठी दिव्य असायचं. मुळात ही सहा फुटांची लांब आणि पाऊण फूट रुंद अशी सागवानी आगळ एका भिंतीतल्या देवळीत आरपार जायची. ती आरपार घालवून दरवाजा उघडणं किंवा तिच्या तोंडाला असणाऱ्या पितळी वाघाच्या जबड्यातील कडीला हात घालून ती बाहेर ओढणं व समोरच्या भिंतीतल्या देवळीत ढकलणं फार अवघड गणित होतं. ही आगळ म्हणजे दरवाजाचं, पर्यायाने वाड्याचं, भरभक्कम संरक्षक कवच होतं. दुपारीही एकदा आगळ टाकली की उन्हाचं, सुट्टीचं आम्हांला बाहेर पडायला संधी नसायची, तसाच रात्री त्या आगळीचा आधारही तितकाच वाटायचा.

**२. i. पुढील घटना उताऱ्याच्या आधारे क्रमाने लिहा.** **[१]**

अ. म्हातारीची ढाळज सुटायची

ब. वाडा शांत व्हायचा

क. कडुसं पडायच्या आधी मैफिल मोडायची

ड. माणसं ढाळजंत बसायची

**ii. एका शब्दात उत्तरे लिहा:** **[१]**

अ. लेखकाच्या गावचं वर्तमानपत्र ............................ .

ब. त्या वर्तमानपत्राचे संपादक ............................ .

३. **व्याकरण**

**तक्ता पूर्ण करा.** **[२]**

| शब्द | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
| --- | --- | --- |
| म्हातारीची | ..................... | ..................... |
| देवळीत | ..................... | ..................... |

४. **'आजी म्हणजे घराचा आधार' हे विधान सोदाहरण पटवून द्या.** **[२]**

**(आ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

१. **आकृतिबंध पूर्ण करा.** **[२]**

**सोनालीची जेवण मागण्याची पद्धत**

सोनालीचं जेवण तीनदा होत असे. सकाळी नाश्ता. नाष्ट्यासाठी तिला दूध व अंडी देत होतो. दुपारी जेवताना मी तिला खिमा देत असे. रात्री मात्र सोनाली शुद्ध शाकाहारी जेवण घेत असे. दूधपोळी, नाहीतर दूधभाताचं आणि त्यासाठी मग ती आमच्या गंगूबाई स्वयंपाकिणीशी लाडीगोडी लावी. जेवायची वेळ झाली, की ती स्वयंपाकघरात जाई आणि स्वयंपाकीणबाईच्या पायांत घोटाळत राही. त्यांच्याभोवती फिरत राही. तोंडानं लाडिक "आव आव" करत त्यांच्याकडे जेवणाची मागणी करी; पण तिचं जेवण ताटलीत टाकलं, की ती गुरगुरायला लागे. ताटली खाली ठेवली, की ताटलीवर तुटून पडे. जिभेनं ताटली चाटून पुसून साफ करून होईपर्यंत तोंडानं तिची गुरगुर चालूच राही. दूधपोळी नि दूधभात खाणारी जगातली ती एकमेव सिंहीण असावी.

तिला व रूपालीला मी मोटारीतून बाहेर फिरायला नेऊ लागलो. दोघींची मोटारीतून बसायची जागाही पक्की ठरलेली. ड्रायव्हरच्या शेजारची सीट ही त्यांची जागा. जाणाऱ्या येणाऱ्यांकडे दोघी खिडकीतून टक लावून पाहत राहत. दोघींचे पंजे दाराच्या बाहेर ऐटीत टाकलेले असत. बैलगाड्या, टांगे, गुरं यांकडे ही जोडी डोळे विस्फारून पाहत असे.

२. i. सोनालीचे जागतिक दर्जाचे वेगळेपण दर्शवणारी गोष्ट **[१]**

ii. 'सोनाली' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा. **[१]**

३. **व्याकरण**

i. खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांचे वचन बदलून वाक्य पुन्हा लिहा: **[१]**

सोनाली जिभेनं <u>ताटली</u> चाटून पुसून साफ करी.

ii. खालील वाक्यातील अव्यये ओळखा: **[१]**

सोनाली जेवणाची मागणी करी; पण तिचं जेवण ताटलीत टाकलं, की ती गुरगुरायला लागे.

अव्यये – ________ , ________

४. **स्वमत** **[२]**

'प्राण्यांनाही भावना असतात' या विधानाशी तुम्ही सहमत आहात का? सोदाहरण स्पष्ट करा.

## <u>अपठित गद्य</u>

**(इ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा:**

१. रिकाम्या जागी योग्य पर्याय भरून वाक्य पुन्हा लिहा: **[२]**

i. लेखकांच्या मते फुलांकडे पाहण्याची भावना ________ अशी असावी.

अ. हारतुरे व गजऱ्यांसाठी फुले     ब. फुलांसाठी फुले

क. पुजेसाठी फुले     ड. सजावटीसाठी फुले

ii. फुलांच्या दृष्टीने योग्य कृती ही आहे ________.
   अ. वेलीवर कळ्या आल्या की त्या तोडाव्या.
   ब. फुले कोमेजून खाली पडल्यानंतर उचलावी.
   क. कोमेजण्याच्या काही तास आधी तोडावीत.
   ड. आपल्या मनाला वाटेल तेंव्हा तोडावी.

'फुले कोणाला आवडत नाहीत ? ती सर्वांनाच आवडतात. कोणाला ती पूजेसाठी हवी असतात. कोणाला ती हारतुरे, गजरे किंवा वेणीसाठी हवी असतात. पण 'फुलांसाठी फुले' या भावनेने त्यांच्याकडे कोणी पाहत नाही. फुले शक्यतो वेलीवर किंवा फुलझाडांवर राहू द्यावीत. ती गळून पडली, तर गोळा करावीत. पारिजातकाचा सडा आपण सतत पाहतच असतो. वेलीवरची फुले कोमेजण्याची वेळ जाणून घेतली व त्यापूर्वी काही तास ती तोडली, तर फुलांच्या दृष्टीने ते न्यायाचे होईल. फुलांचा विचार असा भावनात्मक पातळीवरून करू नये, असे अनेकांना वाटेल; पण फुलांची कोमलता भावनांना स्पर्श करणारी असते. फुले म्हणजे निसर्गाचे भावकाव्यच जणू !

अशी ही फुले तशी कोणाचीच नसतात आणि तरीही ती सर्वांची असतात. रंग, रूप, गंध यांची अखंड उधळण करून आपले जीवन रसपूर्ण, अर्थपूर्ण, भावपूर्ण करण्याचे काम ती मूकपणे करीत राहतात. या फुलांचे उतराई व्हावे कसे ? जड वस्तूंची पूजा फुलांनी करण्याऐवजी फुलांची पूजा भावनांनी केली तर ? ती अधिकच फुलतील आणि जगाचे नंदनवन करतील. गावागावांत फुलांसाठी मंदिरे असावीत. घराघरांत केवळ फुलांसाठी स्वतंत्र चौरंग असावा.

**२. आकृतिबंध पूर्ण करा.** **[१]**

i. **फुले मानवी जीवनावर ज्यांची उधळण करतात ते घटक**
   ↓ ...................... ↓ ......................

ii. **फुलांच्या प्रती उतराई होण्यासाठी लेखकाने सुचवलेले उपाय** **[१]**
   → ......................
   → ......................

**३. व्याकरण** **[२]**

i. खालील वाक्यातील अलंकार ओळखा:
   'फूल म्हणजे निसर्गाचे भावकाव्यच जणू !'

ii. खालील वाक्यातील अधोरेखित शब्दासारखे इतर दोन शब्द लिहा :
   <u>गावागावांत</u> फुलांसाठी मंदिरे असावीत.

**४. स्वमत** **[२]**

तुमच्या आवडत्या कोणत्याही पाच फुलझाडांची नावे लिहून त्यांपैकी कोणत्याही एका फुलझाडाचे वर्णन 2 ते 3 वाक्यांत करा.

## विभाग २ – पद्य

**2. (अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. आकृती पूर्ण करा.** **[२]**

**संत रामदास यांनी**
**कधीही न करायला सांगितलेल्या गोष्टी**
↓ ................. ↓ .................

श्रोती व्हावें सावधान। आतां सांगतों उत्तम गुण।
जेणें करितां बाणे खुण। सर्वज्ञपणाची ।। १।।
वाट पुसल्याविण जाऊं नये। फळ ओळखिल्याविण खाऊं नये।
पडिली वस्तु घेऊं नये। येकायेकीं।। २।।
जनीं आर्जव तोडूं नये। पापद्रव्य जोडूं नये।
पुण्यमार्ग सोडूं नये। कदाकाळीं।। ३।।
तोंडाळासीं भांडों नये। वाचाळासीं तंडों नये।
संतसंग खंडूं नये। अंतर्यामीं ।। ४।।
आळसें सुख मानूं नये। चाहाडी मनास आणूं नये।
शोधल्याविण करूं नये। कार्य कांही ।। ५।।
सभेमध्यें लाजों नये। बाष्कळपणें बोलों नये।
पैज होड घालूं नये। कांही केल्या ।। ६।।
कोणाचा उपकार घेऊं नये। घेतला तरी राखों नये।
परपीडा करूं नये। विश्वासाघात ।। ७।।
व्यापकपण सांडूं नये। पराधेन होऊं नये।
आपलें वोझें घालूं नये। कोणीयेकासी ।। ८।।
सत्यमार्ग सांडूं नये। असत्य पंथें जाऊं नये।
कदा अभिमानं घेऊं नये। असत्याचा ।। ९।।
अपकीर्ति ते सांडावी । सत्कीर्ति वाडवावी ।
विवेकें दृढ धरावी। वाट सत्याची ।। १०।।

२. **i. अचूक विधान ओळखा:** **[१]**

अ. पैज, होड लावावी. ब. सत्याची वाट धरावी.
क. पापद्रव्य सहज जोडावे. ड. नेहमी अभिमानाने वागावे.

**ii. खालील गोष्टींबाबत संत रामदास कोणती दक्षता घ्यायला सांगतात ?** **[१]**

| गोष्टी | दक्षता |
|---|---|
| **आळस** | ..................... |
| **उपकार** | ..................... |

३. **काव्यसौंदर्य:** **[२]**

'अपकीर्ति ते सांडावी। सत्कीर्ति वाडवावी।' या काव्यपंक्तीतून व्यक्त होणारे विचारसौंदर्य स्पष्ट करा.

४. **काव्यसौंदर्य:** **[२]**

जनीं आर्जव तोडूं नये। पापद्रव्य जोडूं नये।
पुण्यमार्ग सोडूं नये। कदाकाळीं ।। यो ओळीचा सरळ अर्थ लिहा.

**(आ) खालील मुद्द्यांच्या आधारे कोणत्याही एका कवितेसंबंधी खालील कृती सोडवा.** **[८]**

कविता : १. वस्तू २. भरतवाक्य

१. प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री ..................... . **[१]**
२. कवितेचा विषय ..................... . **[१]**
३. कवितेचा काव्यसंग्रह ..................... . **[१]**
४. कवितेतून व्यक्त होणारा स्थायिभाव ..................... . **[१]**
५. कवितेतून व्यक्त होणारा विचार ..................... . **[२]**
६. कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे ..................... . **[२]**

(इ) **खाली दिलेल्या काव्यपंक्तींचे रसग्रहण करा.** **[४]**

'झरा लागेलच तिथे
खोद आणखी जरासे
उमेदीने जगण्याला
बळ लागते थोडेसे !'

## विभाग ३ – स्थूलवाचन

३. **खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** **[६]**

१. 'माणुसकी पेरणे काळाची गरज' या विधानाचा तुम्हांला कळलेला अर्थ स्पष्ट करून लिहा.

२. पुढील मुद्द्यांच्या आधारे दिलेल्या विषयावर टीप लिहा.

लेफ्टनंट स्वाती महाडिक
- त्यांची जिद्द व त्यांचे प्रशिक्षण
- त्यांचा निर्धार

३. साहित्यिक गिरिजा कीर यांच्या कथेची वैशिष्ट्ये लिहा.

## विभाग ४ – भाषाभ्यास

४. (अ) **व्याकरण घटकांवर आधारित कृती.**

१. **समास** **[२]**

**खालील तक्ता पूर्ण करा.**

| सामासिक शब्द | विग्रह | समास |
|---|---|---|
| तोंडपाठ | | |
| | बाप आणि लेक | |

२. **अलंकार** **[२]**

**खालील कृती करा.**

डोकी अलगद घरे उचलिती
काळोखाच्या उशीवरूनी

प्रस्तुत ओळीतील अचेतन घटक - ☐

प्रस्तुत ओळीतील मानवी क्रिया - ☐

प्रस्तुत ओळीतील झालेला अलंकार - ☐

३. **वृत्त** **[१]**

**खालील काव्यपंक्तींतील वृत्त ओळखा.**

सदा सर्वदा योग तुझा घडावा।
तुझे कारणी देह माझा पडावा।।

वरील ओळीतील वृत्त ओळखा.

४. **शब्दसिद्धी**

**खालील तक्ता पूर्ण करा.** [२]

अवजड, लढाई, निरोगी, जमीनदार.

| प्रत्ययघटित | उपसर्गघटित |
|---|---|
| | |
| | |

५. **सामान्यरूप** [१]

**पुढील शब्दांची सामान्यरूपे लिहा.**

घरात

जिभेला

६. **वाक्प्रचार** [२]

**i. खालील वाक्प्रचार व त्यांच्या अर्थांच्या योग्य जोड्या जुळवा.**

| | वाक्प्रचार | | अर्थ |
|---|---|---|---|
| i. | कंठस्नान घालणे | अ. | खूप आनंद होणे. |
| ii. | आनंद गगनात न मावणे | ब. | नाराजी व्यक्त करणे. |
| | | क. | ठार मारणे. |

**ii. कंसातील वाक्प्रचारांचा त्याखालील वाक्यात योग्य ठिकाणी वापर करून वाक्ये पुन्हा लिहा.**

(कान दोऊन ऐकणे, मुहूर्तमेढ़ रोवणे, अचंबित होणे)

अ. सरांचे भाषण मी लक्षपूर्वक ऐकत होतो.

ब. सर्कशीतील रोमांचक कसरती पाहून राधा आश्चर्यचकित झाली.

**(आ) भाषासौंदर्य**

१. **शब्दसंपत्ती**

**i. खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा.** [१]

अ. केलेले उपकार न जाणणारा -

ब. कोणाचाही आधार नसलेला –

**ii. गटात न बसणारा शब्द शोधून लिहा.** [१]

अ. सदन, सधन, भवन, निकेतन -

ब. जल, नभ, गगन, आकाश -

**iii. खालील शब्दाचे दोन अर्थ लिहा.** [१]

[ ] — अंबर — [ ]

**iv. सहसंबंध ओळखा.** [१]

गुण : दोष :: जहाल : [ ]

प्रत्यक्ष : [ ] :: आदर : अनादर

२. **लेखननियमांनुसार लेखन**

**i. अचूक शब्द ओळखा.** [१]

अ. आशिर्वाद / आशीर्वाद / आर्शीवाद / आशिरवाद.

ब. उपस्थिती / उपस्थीती / उपस्थीति / ऊपस्थिती.

ii. **खालील वाक्य लेखननियमांनुसार लिहा.** **[१]**

हीवाळा नूकताच सुरू झालेला होता.

३. **विरामचिन्हे**

i. **खालील वाक्यात योग्य विरामचिन्हे वापरून वाक्य पुन्हा लिहा.** **[१]**

तुमचे केस अजून काळे कसे राहिले आहेत

ii. **चुकीची विरामचिन्हे बदलून वाक्य पुन्हा लिहा.** **[१]**

ते म्हणाले. "लक्षात नाही आलं"?

४. **पारिभाषिक शब्द**

**खालील शब्दांना प्रचलित मराठी भाषेतील शब्द लिहा.** **[१]**

i. Index ☐

ii. Honourable ☐

५. **अकारविल्हे**

**खालील शब्द अकारविल्हे लिहा.** **[१]**

गणित, भूगोल, भाषा, इतिहास.

## विभाग ५ – उपयोजित लेखन

५. (अ) **खालील कृती सोडवा.**

१. **पत्रलेखन** **[५]**

**खालील निवेदन वाचा व त्याखालील कोणतीही एक कृती सोडवा.**

**खुशखबर! खुशखबर! खुशखबर!**

**दिनांक व वेळ**
**१५ ऑक्टोबर**
**सायं – ४ वाजता**

विद्या विनयेन शोभते

ज्ञान प्रकाशन, औरंगाबाद तर्फे

उत्कृष्ट बालसाहित्य पुरस्कारप्रदान सोहळा

पुरस्कारार्थी – डॉ. विजया वाड

नामवंत लेखिका

**टीप: कार्यक्रमस्थळी सकाळी १० ते रात्री ८ पर्यंत सवलतीच्या दरात पुस्तक विक्री.**

स्थळ : ज्ञान प्रकाशन कार्यालय, आनंदनगर, औरंगाबाद

ज्ञानदा विद्यालय, औरंगाबाद येथील विद्यार्थी प्रमुख या नात्याने प्रकाशकांकडे पुस्तकांची मागणी करणारे पत्र लिहा.

किंवा

नामवंत लेखिका डॉ. विजया वाड यांच्या बालसाहित्याला पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

२. **सारांशलेखन** [५]

विभाग - १ : गद्य (इ) (प्रश्न क्र. १ (इ)) मधील अपठित उताऱ्याचा एक तृतीयांश एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.

**(आ) खालील कृती सोडवा.**

१. **कथालेखन** [६]

वर्गातर्फे 'सुंदर हात' स्पर्धेचे आयोजन – सर्वांचा सहभाग – हात सुंदर दिसावे म्हणून प्रत्येकाचे प्रयत्न – स्पर्धेचा दिवस – सर्वजण उत्सुक – मोनाचा स्पर्धेतील सहभागाला नकार – कष्टाने रापलेले न सजवलेले हात लपवणे – बाईंकडून सर्वांच्या हातांचे निरीक्षण – मोनाचे हात बक्षीसपात्र –

२. **बातमीलेखन** [६]

**खालील विषयावर बातमी तयार करा.**

१५ डिसेंबर रोजी जिल्हापरिषद माध्यमिक शिक्षण विभाग, अमरावतीतर्फे आयोजित आंतरशालेय निबंधस्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा संपन्न.

**(इ) खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा.** [८]

१. **प्रसंगलेखन:**


**जाहीर निमंत्रण - 'कौतुक सोहळा'**
गावाचे भूषण
'विनय जाधव' यांचा
सैन्यात भरती झाल्याबद्दल समस्त
पारनेर गावकऱ्यांतर्फे जाहीर सत्कार
मुख्य उपस्थिती – मा. सूर्यकांत आगाशे
(निवृत्त कर्नल)

दि. – ९ जून
वेळ – सायंकाळी ५.००
स्थळ – अजिंक्य क्रीडा मैदान, पारनेर.

वरील कौतुक सोहळ्याला तुम्ही गावकरी म्हणून उपस्थित होता. अशी कल्पना करून प्रसंगलेखन करा.

२. **खालील चौकटीतील घटकाचे आत्मकथन लिहा.**

मी पृथ्वी बोलते आहे.




[वरील मुद्दे केवळ मार्गदर्शक आहेत.]